| MHRT060010262022 | संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४६१/२०२२<br>CNR NO.MHRT060010262022<br>नि.५ लगत |
|---|---|

## न्यायनिर्णय
## (जाहीर केला दि.०९/११/२०२३)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा, कलम ६५(ई) प्रमाणे आरोप ठेवून चालविण्यात आलेला आहे.

(२) खटल्याच्या निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे आहेतः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ०६/०९/२०२२ रोजी ठिक १८.१५ वाजताचे दरम्यान गावतळे हनुमाननगर, जिल्हा रत्नागिरी येथे आरोपीच्या ताब्यात गैरकायदा, बिगरपरवाना १८० मिली मापाच्या टँगो पंच देशी दारुच्या १६ प्लास्टीकच्या बाटल्या, ६५० मिली मापाच्या टुबर्ग प्रिमीयम बिअरच्या ६ काचेच्या बाटल्या व ५ लिटर मापाचा प्लास्टीकचा कॅन ५ लिटर गावठी हातभट्टीचे दारुने भरलेला बाळगलेल्या स्थितीत मिळून आला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

(३) आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होणेकरिता अभियोग पक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले आहेत. पंच साक्षीदार क्र.१ रमेश गौरु पवार व साक्षीदार क्र. २ फिर्यादी श्रीमती निधी निलेश जाधव यांची साक्ष निशाणी ५ लगत नोंदविली आहे. याकामी अभियोग पक्षाने कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी पी–१/पीडब्ल्यू–२ येथे फिर्याद दाखल केलेली आहे.

**मुद्दा क्र.१ करिताः–**

(४) आरोपीविरुध्द गुन्हा शाबित करणेकरिता घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्रमांक १ श्री. रमेश गौरु पवार यांची साक्ष निशाणी ५ लगत नोंदविलेली आहे. सदरहू पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत करण्यास मदत केलेली नाही. म्हणून सरकारी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन त्यांना उलटतपासामध्ये विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. तरीही सदरहू पंच साक्षीदाराकडून अभियोग पक्षाचे हकीकतीस सहाय्य होईल असा मजकूर वदवून घेण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले आहे.

(५) अभियोग पक्षाने साक्षीदार क्रमांक २ फिर्यादी श्रीमती निधी निलेश जाधव, महिला पोलीस हवालदार, दापोली पोलीस स्टेशन यांची साक्ष निशाणी ५ लगत नोंदविली आहे. सदरहू साक्षीदाराने दिनांक ०६/०९/२०२२ रोजी ते पोलीस स्टेशनमध्ये हजर असताना त्यांना विश्वसनीय बातमी मिळाली की,गावतळे तालुका दापोली येथे एक इसम हा चोरटी दारु विक्रीचा व्यवसाय करत आहे. सदरची बातमी मिळालेनंतर स्टेशन डायरीला नोंद करुन स्टाफसह खाजगी गाडीने गावतळे येथे आले. त्या ठिकाणी आलेनंतर डांबरी रस्त्याने पहाणी करत चालले असताना एका बंद टपरीच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम बसलेला मिळून आला. त्याला जागीच पकडले व त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदेश नारायण जाधव असे सांगितले. त्याने विक्री करीता आणलेला माल त्यांनी ताब्यात घेतला व रासायनिक विश्लेषणाकरीता पाठवून दिला व उर्वरीत मुद्देमाल घेवून पोलीस स्टेशनला आले. त्यानंतर त्यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली. सदरची फिर्याद निशाणी पी–१/पी.डब्ल्यू–२ येथे आहे. तसेच छापील प्रथम खबर फिर्याद निशाणी पी–२/पी.डब्ल्यू–२ येथे आहे. आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये सदरहू साक्षीदाराने घटनास्थळ हे कोणाच्या मालकीच्या जागेत आहे याबाबत चौकशी केलेली नाही. तसेच आरोपीच्या ताब्यातून किती लिटर दारु जप्त केली हे ती सांगू शकत नाही.

(६) अभियोग पक्षाच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,

याकामी अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द केस शाबित करणेसाठी आरोपीच्या ताब्यात विनापरवाना ५ लिटर हातभट्टीची गावठी दारु तसेच १८० मिली मापाच्या टँगो पंच देशी दारुच्या १६ प्लास्टीकच्या बाटल्या, ६५० मिली मापाच्या टुबर्ग प्रिमीयम बिअरच्या ६ काचेच्या बाटल्या आरोपीने बेकायदेशिररित्या बाळगल्या ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, अभियोग पक्षाचा तोंडी पुरावा पाहिला असता असे दिसून येते की, घटनास्थळ व जप्ती पंचनामा हा स्वतंत्र पंच साक्षीदारांमार्फत शाबीत झालेला नाही. त्यामुळे सदरचा मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला ही बाब शाबीत होत नाही.

(७) साक्षीदार क्रमांक २ फिर्यादी श्रीमती निधी निलेश जाधव, महिला पोलीस हवालदार दापोली पोलीस ठाणे यांचेतर्फे फिर्याद शाबीत करणेत आलेली आहे. परंतु केवळ फिर्यादीच्या पुराव्यावर अवलंबून राहून आरोपीचे ताब्यात गैरकायदा बिगर परवाना हातभट्टीची दारुचा कॅन व देशी दारुच्या बाटल्या व बिअरच्या बाटल्या मिळून आल्या ही बाब शाबीत होवू शकत नाही. अभियोगपक्षाने रासायनिक पृथःकरणाचा अहवाल याकामी सादर केलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त करणेत आलेला मुद्देमाल हा देशी विदेशी दारु व हातभट्टीची दारु तसेच बिअर होती हे पुरेशा पुराव्याअभावी शाबीत झालेले नाही. त्यामुळे अभिलेखावरील आलेला पुरावा हा आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीत होणेस पुरक नाही. अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा पाहता जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच याकामी स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध असताना देखील अभियोग पक्षाने कोणीही स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाहीत. त्यामुळे आरोपीस केवळ फिर्यादीच्या पुराव्यावर अवलंबून राहून दोषी धरता येणार नाही. अभियोगपक्षाचे हकीकतीस पुष्टी देणारा कोणताही पुष्टीदायक तोंडी पुरावा अभिलेखावर सादर झालेला नाही. या सर्व कारणास्तव अभियोग पक्ष आरोपीविरूध्द गुन्हा निःसंशयपणे शाबित करणेस अयशस्वी ठरलेने आरोपीला दोषमुक्त करणे योग्य वाटते.

(८) याकामी जप्त असलेल्या मुद्देमालाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे योग्य होणार आहे. त्याचप्रमाणे, फौ.प्र. संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणून आरोपीने सहा महिन्यांच्या कालावधीसाठी र.रु.७,५००/– चा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा द्यावा असा आदेश करणे उचित ठरेल. सबब, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष त्याप्रमाणे देवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतोः–

## आ दे श

१. आरोपी संदेश नारायण जाधव, राहणार गावतळे हनुमाननगर, तालुका दापोली, जि. रत्नागिरी, यास फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायदा, कलम ६५(ई) या गुन्हयातून दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीनकदबा व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ प्रमाणे पुर्ततेकरिता वैयक्तिक जातमुचलका र.रु.७,५००/– चा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल १८० मिली मापाच्या टँगो पंच देशी दारुच्या १६ प्लास्टीकच्या बाटल्या, ६५० मिली मापाच्या टुबर्ग प्रिमीयम बिअरच्या ६ काचेच्या बाटल्या, ५ लिटर मापाचा प्लास्टीकचा कॅन त्यामध्ये ५ लिटर गावठी हातभट्टीची दारु हे अपील कालावधीनंतर नियमानुसार नाश करणेचे कामी कलेक्टर, राज्य उत्पादन शुल्क विभाग रत्नागिरी यांचेकडे पाठविणेचे निर्देश पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांना देणेत येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

**सही/–**

**दापोली.** **(श्रीम. टी.एस. महाडीक)**

**दि. ०९/११/२०२३.** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दापोली.**

I affirm that the contents of the P. D. F. file order are same, word to word as per original Order.

| | |
|---|---|
| Court Name : | Smt. Tejaswini Sandeep Mahadik<br>Judicial Magistrate First Class, Dapoli. |
| Name of Stenographer : | R.K.Sangare |
| Date of decision : | 09/11/2023 |
| Judgment signed by Presiding Officer on : | 09/11/2023 |
| Judgment uploaded on : | 09/11/2023 |